*कथा क्रमांक ३*

# देवदूत

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि सरावानेच दिव्याच बटन दाबल. मंद प्रकाशावर बाहेरचा ओला काळोख ओघळू पाहत होता. घर गावाबाहेर तसं एकाकी. एकूण गावाशी फटकून असलेलं. छोटी बंगली म्हणता येईल असं. वसतीपासून दूर नको म्हटलं तरी नवऱ्याने तिचे ऐकले नव्हते. त्याला एकांताची आवड होती. कोणाचाही जास्त संपर्क नको असायचा. दोन्ही मुलंही तशीच घुमी. सतत पुस्तकात रमणारी. दोघेही परदेशात निघून गेली. ती त्या घरात एकटीच राहिली. तिला त्या घरात करमतही नव्हतं आणि ते घर सोडून जाणेही

जमत नव्हतं. आठवणींच्या गुंत्याने तिला तिथेच जखडून ठेवलं होतं. बाहेर पावसाची गाज एका सुरात चालू होती. दरवाजाबाहेर काहीतरी खुडबुड ऐकू आली. तिने कानोसा घेतला. कोणीतरी दरवाजावर ओरखडत होतं. तिच्या छातीत थोडं धडधडलं. दार उघडून पहायची हिम्मत होत नव्हती. शेवटी धीर एकवटून दार थोडं किलकिलं केलं. बाहेर कोणीच नव्हतं. तिच्या मणक्यातून एक थंड शिरशिरी उमटली. ताबडतोब दार बंद करण्याची सूचना मेंदूने दिली. पण तेव्हढ्यात तिचं लक्ष जमिनीकडे गेलं.त्या छोट्याश्या फटीतून एक लहान पंजा आत आला होता. दाराची फट थोडी रुंद करून तिने पाहिलं. जेमतेम ओंजळीत बसेल इतकं लहान कुत्र्याचं

पिल्लू वर पाहत होतं. पावसात भिजल्यामुळे थंडीने थरथरत होतं. आपली केविलवाणी नजर त्याने तिच्याकडे लावली. त्या नजरेत याचना होती. तिला प्राण्यांची आवड नव्हती.मुलांनी हट्ट धरला तरी प्राणी पाळण्याला तिने सक्त विरोध केलेला होता. त्यात अशा भिजलेल्या कुत्र्याच्या अंगाला येणारा वास तिला अजिबात आवडत नसे. पुन्हा लहान असलेल्या त्या पिलांना रात्री आईची आठवण झाली की ती जो करूण आवाज काढत राहायची तो तिला सहन होत नसे. पण या वेळेला तिच्या मनात काही वेगळेच विचार आले. आपल्या सारखंच हे पिल्लूही एकाकी आहे हा समान धागा तिला जाणवला. स्वतःला त्याच्यासारखंच निराधार व केविलवाणे

समजण्याला तिचा अंतर्विरोध होता. कारण नियतीसमोर प्रत्येक व्यक्ती तशीच असहाय असली तरी तिचा अहंकार ती वस्तुस्थिती स्वीकारत नाही. विचारांच्या तंद्रीत तिने त्या पिल्लाला प्रवेश देण्याचा निर्णय घेतला. आपली लटपटणारी छोटीशी पावलं टाकत त्याने घराच्या उबेत प्रवेश केला. सर्वप्रथम त्याने वाकडी मान करून वर पाहिले आणि आपली इवलीशी शेपटी हलवून तिचे आभार मानले. गरम पाण्याने त्याला चटकन अंघोळ घालून फडक्याने पुसताना तिच्या लक्ष्यात आले की त्याच्या अंगावरची लव सोनेरी आहे आणि तिचे प्रमाणदेखील जास्त आहे. त्याचे नाव सध्याच्या फैशनप्रमाणे गोल्डी

न ठेवता तिने त्याला सोनू म्हणू या असे ठरविले.

सोनू दिवसेंदिवस वाढत होता. त्याच्या अंगावरची सोनेरी लवही आता दिवसेंदिवस दाट होत चालली होती. आणि जसा तो वाढू लागला तसा त्याला चांगला आकार येऊ लागला होता. अगदी गोंडस, बोलके डोळे, छोटीशी दिसणारी नाकाची दोन भोकं आणि अतिशय चमकदार असा त्याचा तो सोनेरी रंग - आता सोनू म्हणजे तिच्या आयुष्याचा अविभाज्य घटकच झाला होता. कोण म्हणेल की एकेकाळी प्राणी पाळण्याला तिचा विरोध होता?

तिने स्वतःच्याच बेडरूममध्ये सोनूसाठी गादी अंथरली होती. त्याच्यासाठी जेवणाचे व पाणी पिण्याचे पात्र आणलं होतं. जनावरांच्या डॉक्टरच्या सल्ल्याने डॉग-फूड ही आणलं होतं पण सोनू तिच्या गादीत तिच्या कुशीतच झोपायचा. तिच्या पानातलंच जेवण त्याला हवं असायचं. तिची दोन्ही मुलं मोठी होऊन परदेशात तिच्यापासून दूर गेली, पण ईश्वरी संकेत म्हणा, आता सोनू म्हणजे तिचं तान्हं बाळच जणू !

आज शनिवार; दोन्ही मुलांचे फोन यायचा दिवस. हल्ली फोनवर "आई, तू कशी आहेस? कधी येतेस इकडे ? तिकीट पाठवू का?" अशी संभाषणाची सुरुवात नसे. "आई, सोनू कसा आहे ? आता किती मोठा दिसतो? आई त्याचे फोटो पाठव ना" असाच संवाद. तिलाही सोनूबद्दल बोलायला खूप आवडायचं. सोनूची तिच्याशी बांधलेली नाळ दिवसागणिक अधिकाधिक घट्ट होत चालली होती.

ती तशी माणसांत रमणारी, नाती जपणारी, सामाजिक बांधिलकीला धरून रहाणारी! आजही तिला बऱ्याच मैत्रिणी होत्या - अगदी शाळेपासूनच्या. सामाजिक कार्यामध्ये तिचा हिरिरीने सहभाग असे. कधी कोणाचे लग्नाचे असो, बारश्याचे असो किंवा सत्यनारायणाच्या पूजेचे असो, आमंत्रण अगत्याचे असो की साधे रस्त्यात भेटून दिलेले असो, ती आमंत्रणाचा मान राखून आवर्जून कार्यक्रमांना उपस्थित राहत असे. पण आता सोनू आल्यापासून फार काळ घरापासून दूर राहाणं ती टाळत असे. तिच्या मैत्रिणीही आता तिची केंडवणी करू लागल्या होत्या.

त्यांचा बंगला बांधून आता बरीच वर्षे उलटली होती. एवढ्या वर्षांत आजूबाजूला ७-८ बंगले, १०-१२ सोसायटींच्या इमारती उभ्या राहिल्या होत्या. जवळच महानगरपालिकेने मुलांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्याने बांधली होती. ती सोनूला रोज संध्याकाळी बागेत फिरायला नेत असे. आजूबाजूच्या घरांतील कुत्रेही तिथे नेमाने येत असत. त्यातला 'स्कीपर' सोनूचा अगदी मित्र झाला होता. ते दोघे खूप छान खेळत. त्यांना एकमेकांची भाषा समजत असे. हा सर्व खेळ पाहताना तिला फार गंमत वाटत असे.

एके दिवशी ती नेहमीप्रमाणे सोनूला बागेत घेऊन गेली. स्कीपरही आला होता. मैत्रिणींबरोबर गप्पा रंगल्या असता एकदम गोंगाट ऐकू आला. सर्वजण आवाजाच्या दिशेने धावले. पाहतात तर काय! सोनू आणि स्कीपर एका माणसाच्या पॅन्टला पकडून त्याला खेचत होते. त्या माणसाची पार घाबरगुंडी उडाली होती. काही लोकांनी त्या माणसाला धरलं व सोनू आणि स्कीपरपासून सोडविण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात एक बाई धावत धावत "माझं मंगळसूत्र, माझं मंगळसूत्र " करीत जमावापाशी आल्या तेव्हा सर्व उलगडा झाला. शेवटी त्या चोराने बाईंचं मंगळसूत्र परत केलं तेव्हाच सोनू आणि स्कीपरपासून त्याची सुटका झाली. एव्हाना पोलीसही घटनास्थळी दाखल झाले होते.

पोलीस ऑफिसर्स  ने जेव्हा सोनू व स्किपरच्या करामतीबद्दल ऐकले तेव्हा तर ते फारच खुश झाले.

"गीता ताई, तुमचा हा कुत्रा...सोनू नाव ना त्याचे? आणि हा दुसरा...स्किपर. अगदी पोलिस कुत्रे होण्याची लायकी दाखवली बरं ह्यांनी!" ऑफिसर राउत चोराच्या हातात बेड्या घालत म्हणाले.

"त्यांना ऑफिसर सोनू आणि ऑफिसर स्किपर अशी पदवीच दिली आहे आज आम्ही !" ऑफिसर कदम हसत म्हणाले.

त्या बागेत जणू सत्कारच झाला सोनू आणि स्किपरचा. कुत्र्यांना बघायला गर्दी तर जमलीच होती. बायका -मुलांनी खूप कौतुक केले कुत्र्यांचे. ऑफिसर राउत इतके खुश झाले की दोन दिवसात सोनू - स्किपर साठी मेडल्स पण तयार केली. मेडल वाली कॉलर घालून जेव्हा सोनूला गीता फिरायला घेउन जायची तेव्हा मुलं सोनू भोवती गोळा होऊन त्याचे लाड करायची.

जेव्हा गीताने स्वतःच्या मुलांना सोनूच्या करामतीबद्दल सांगितले तेव्हा मुलांनी उन्हाळ्यात भारतात यायचा बेत पक्काही केला. खरच गीताला फार बरे वाटले हे ऐकून.

सोनूने गीताचे आयुष्य, तिच्या घरचं वातावरण, तिचं नशीबच बदलून टाकलं होतं. दागिन्याहून  मूल्यवान होता तिचा सोनू. त्याला मिरवण्यात तिला अपार आनंद मिळायचा.

एकदा नेहमीप्रमाणे गीता सोनूबरोबर बागेत असताना ऑफिसर कदम तिथे आले. त्यांच्या सोबत एक लहान मुलगी होती, दहा -अकरा वर्षांची. त्या दिवशी बागेत फार कोणी नव्हते. सोनूला लहान मुलं आवडायची. त्यामुळे तो ह्या मुलीभोवती नाचायला लागला. तिने दुर्लक्ष केले आधी, पण मग तिचा जरा दुःखी, निस्तेज चेहरा खुलला. तिने स्मितहास्य केले. सोनूला ती कुरवाळायला लागली. तो थोडा धाउन पुढे गेला, व आशाळभूत नजरेने तिच्याकडे बघू लागला. ती त्याच्या मागे गेली.

"मी ही जातो त्यांच्या मागे," कदम म्हणाले.

पंधरा -वीस मिनिटात तिघे परत आले. मुलीच्या चेहर्यावर आनंदाची छटा होती आता.

"ही माझी पुतणी, रेवती," कदम म्हणाले. "हिचा वेळ आज सोनूच्या सहवासात फार छान गेला."

दुसर्या दिवशी बेल वाजली तर दारात कदम साहेब होते .

"काय म्हणतोय आमचा छोटा हीरो?" त्यांनी सोनूला कुरवाळले. "आज मी इथे काहीतरी मागायला आलो आहे - रेवतीसाठी."

"अगदी मागा हवे ते," गीता म्हणाली.

"काल तुम्ही माझ्या पुतणीला भेटलातच. सहा महिन्यांपूर्वी रेवतीची आई एका अपघातात गेली. रेवतीला मोठा धक्का बसला. रेवती रोज शाळेत जाते, अभ्यास करते घरी आल्यावर; पण कशातही जीव नाही हो तिचा. फार बोलत नाही; स्वतःच्या खोलीत जाउन पुस्तक तरी वाचते, किंवा फोटो अल्बम बघत बसते. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देते. त्यानंतर गप्प. आई नसल्याचा तिला फार मानसिक त्रास होतोय. पण ती कोणाशीही याबद्दल बोलत नाही. वडिलांशीही नाही.

"काल सोनूच्या सहवासात रेवतीचा चेहरा खुलला. खूप दिवसांनी. सोनूच रेवतीला बरं करू शकेल असं मला वाटतं. तो असा अवतीभवती आनंद पसरणारा आहे. तो प्रेम मागून घेतो आणि प्रेम देतो ही. त्याला प्रेम देण्यात, आणि त्याचे निःस्वार्थी प्रेम स्वीकारण्यात रेवतीला आनंद मिळेल हो.

सोनू -रेवतीची पुन्हा भेट होऊ शकेल ना?"

"अर्थात !" गीता म्हणाली, "अगदी तुम्ही म्हणाल तेव्हा "

दिवस झराझर सरले. मधल्या काळात रेवती कितीतरी वेळा सोनुशी खेळायला घरी येऊन गेली. रेवतीमुळे गीताचा सुद्धा वेळ मजेत जात होता. गीताला वाटायचे, आईविना ही मुलगी... तिच्या भावनांना जपायला हवे. गीता स्वतःहून तिला हवे नको ते बघायची. रेवतीला सुद्धा ह्या घरचा लळा लागला. आणि आता गीता तिच्या दोन्ही मुलांची वाट बघत होती. आठवड्यात ती दोघे हजर होणार होती - महिन्याभरासाठी! बऱ्याच दिवसांनी रेवतीसुद्धा कदम साहेबांबरोबर गावाला जाणार होती सुट्टीला.

गीताने भरभर घर आवरायला सुरुवात केली. मुलांच्या खोल्यांना रंग लावला, प्रसन्न पडदे लावले, चादरी बदलल्या. मैत्रिणीला विचारून स्वयंपाकाच्या बाईंना पुढच्या आठवड्यापासून बोलावून घेतले. आता मुलांना घरी आल्यावर खूपच नवीन वाटणार होते. गीताच्या मैत्रिणींनी तिला सगळ्या बदलांची पसंतीची पावती दिली!

या सगळ्या गडबडीत गीताचे सोनूकडे लक्ष होतंच पण नेहमीइतके नाही. सोनूला ते सगळे समजत होते की काय कोणास ठाऊक पण तो अस्वस्थ होता. कधीही जोरात ना भुंकणारा सोनू दिवसा आणि रात्री भुंकून गीताला बेजार करायचा. दिवसभराच्या श्रमांनी थकलेली गीता त्याच्या त्या भुंकण्याने करवादून जायची. कधी नव्हे ते ती त्याच्यावर ओरडायला लागली.

गीतालासुद्धा सोनूच्या वागण्यातला फरक समजत होता पण त्याचे कारण कळत नव्हते. "याला बरे नाहीये का? हा रेवतीला मिस करतोय का? काय नक्की होतय ह्याला? आता उद्याच मुले यायचीत आणि हा असाच वागला तर मुलांना काय वाटेल? मुलांचे आणि ह्याचे नीट नाही जमले तर तीन माणसांच्या तीन तऱ्हा मी कशा सांभाळू? " एक नाही हजार विचार गीताच्या मनात येऊन गेले. त्याही विचारात तिला स्वतःचे हसूदेखील आले ... आपण सोनूलासुद्धा माणूसच समजतोय! त्याचा माणसासारखाच विचार करतोय!

पण खरंच किती बरोबर बोलून गेले कदमसाहेब त्या दिवशी... की सोनू असा अवतीभोवती आनंद पसरविणारा आहे. तो प्रेम मागून घेतो आणि प्रेम देतो ही... .

एकदम गीताला काहीतरी जाणवले. अरे, बहुदा आपण या काही दिवसात या गोड बछड्याला प्रेम द्यायला विसरलोय. खरंच हा माणसासारखाच वागतोय आता, आपल्याकडून प्रेमाची अपेक्षा करतोय. याचाच अर्थ मुले आल्यावर याच्याकडे जरा दुर्लक्ष झाले तर हा नक्कीच बिथरणार. गीताने पटकन उठून सोनूला जवळ घेतले, त्याचे सोनेरी केस कुरवाळले आणि हळूच त्याला म्हटले, "सोनू, अरे मी तुला कशी विसरेन? तू तर माझ्या आयुष्याचा एक मोठ्ठा तुकडा आहेस. तुझ्यामुळेच तर आज मी पुन्हा छान हसत-खेळत आयुष्य जगतेय. आणि मुले आली ना, तरीही तूच माझा सगळ्यात लाडका आहेस बरे का!"

सोनूने गीताकडे बघितले आणि तेवढ्यात दाराबाहेर मोठ्ठा आवाज झाला. गीता आणि सोनू धावतच दाराकडे गेले. दार उघडून बघतात तर काय.....

अरे बापरे! हा कसला एवढा मोठा आवाज झाला? गीताने लगेच उठून दार उघडून बाहेर पाहीले तर कंपाऊंड बाहेर एक मॅटॅडोअर ऊभा असून त्यातील कांही भरलेली गोणपाटे खाली रस्त्यावर पडली होती आणि दोन माणसे त्या गोणी  परत मॅटॅडोअरमध्ये ठेवत होती. आपले सोनूसाहेब होतेच मदतीला तत्पर! सोनू भुंकत, भुंकत धावत गेट बाहेर गेला. त्याचे ते भुंकणे ऐकून तो मॅटॅडोअर घाईने निघूनही गेला. त्यांच्या  गोणी भरून झाल्या होत्या.

जिथे त्या गोणी पडल्या होत्या तिथे थोडेसे काहीतरी पावडरीसारखे पडले होते. सोनूने त्याचा वास घेतला व त्याने धूम ठोकून जिवाच्या आकांताने त्या मॅटॅडोअरचा पाठलाग केला. मॅटॅडोअरमधील माणसांचे त्याच्याकडे लक्षही नव्हते. ते कसेबसे जिव मुठीत घेऊन त्यांच्या संकेत स्थळी पोहचले. सोनूने ती जागा नीट हेरून ठेवली व तो मागच्या पावली घरी परतला.

गीताला एकंदरीतच त्या माणसांच्या हालचाली व सांडलेल्या त्या पावडरीवरून संशय आला होता. ती ब्रिगेडीयरची पत्नी असल्यामुळे चांगलीच धाडसी होती. देशद्रोहयांच्या करामतीची तिला चांगलीच माहिती होती. तिने लागलीच पोलीसांना फोन करून बोलावून घेतले. त्यांना तिने, अगोदरच घडलेली हकीकत व तिला आलेल्या दारूगोळ्याच्या संशयाच्या बाबतीत सांगितले होते. पोलीस सर्व तयारीनिशी आले होते. पोलीसांची सगळी तपासणी होईपर्यंत सोनूने नुसता गोंधळ घातला होता. पोलीस सोनूला ओळखत होते. सोनूची अक्कल हुशारी त्यंना ठाऊक होती. ते लगेच सोनूच्या पाठोपाठ त्या संकेतस्थ्ळी पोहचले. आता पुढचे काम पोलिसांचे!

आत्ताकुठे गीताला सोनुच्या अस्वस्थ होण्याचे कारण समजले. कारण कुत्र्याना भविष्यातील संकटांची चाहूल वा घटनांचा थांग आधीच लागतो. ती एक देवाने त्यांना दीलेली देणगी आहे. दुसऱ्या दिवशी पेपरात एक ठळक अक्षरात बातमी आली की, पोलीसांना मोठ्या प्रमाणात rdxचा साठा मिळाला. पोलिसतपास चालू आहे.

दुसऱ्या दिवशी रात्री अमर व समर दोन्ही भाऊ अमेरिकेहून परतले. सोनूने एअर्टपोर्टपासूनच गाडीमध्ये आपली जागा नक्की करून टाकली. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रत्येक गोष्टीत सोनूचा सहभाग असायचाच.

सकाळी चहा नाष्त्याच्यावेळी मात्र पावाचे तुकडे असलेले दुधाचे भांडे टेबलापासून लांब ठेवलेले असायचे. गीताने त्याचे जेवढे लाड केले तेवढेच चांगले वळणही लावले होते. सोनूला खरच आपण बोललेले सर्व कळायचे. आपण गप्पा करताना आपल्याकडे अशा नजरेने बघायचा अगदी डोळ्यात डोळे घालून की जणू आपल्याशी संभाषणच करतोय. त्याचे डोळे बोलकेच आहेत. जरा अमर  किंवा समर गीताजवळ बसायला गेले की, सोनू पटकन उडी मारून तिच्या मांडीवर डोके ठेवून झोपायचा जणू ती मांडी फक्त त्याच्याच मालकीची. गम्मतच आहे सगळी.

दिवस कसे भुरूभरू गेले ते कळलेच नाही. अमर व समरला जायला आता फक्त दोनच दिवस होते आणि अचानक त्यांच्या घरी पोलिस ईन्सपेक्टर राऊत दोन शिपांयानबरोबर आले व म्हणाले, “ऊद्या गीता व सोनूचा  ‘गौरव’ करायचे ठरले आहे. त्यांना दोघांनाही गौरवचीन्ह व मानपत्र देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम पार्कमध्ये करण्यात येणार आहे.”

गीता----- “काय सांगताय काय? त्या केसचं पुढे काय झाले? माझी मुलं सुट्टीत आल्यामुळे मी एवढी बिझी झाले की, त्या गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नाही.”

ईन्सपेक्टर-----“अहो तुमच्या प्रसंगावधानाने व सोनूच्या हुशारीमुळे आम्ही हे सर्व करू शकलो. आम्हालाही मोठ्ठा RDXचा साठा तेव्हाच मिळाला पण त्यांच्या पाळामुळांपर्यंत शिरून सर्व माहिती गोळा करेपर्यंत आम्हाला एक महिना लागला. हया केसमध्ये पुष्कळ जणांची धरपकड झाली. आता फक्त तुम्ही ऊद्या संध्याकाळी पांच वाजता नक्की सोनूला घेऊन या.”

गीताने होकार देऊन येण्याचे आश्वासन दिले तरी मुलांची रात्री 2:40ची फ्लाईट होती. तिला काय करावे ते कळेना. पण मग अमर व समर म्हणाले, “आई, एवढा तुमचा दोघांचा सन्मान होणार आहे तर आम्हालाही हे सर्व पहायला आवडेल व अभिमानही वाटेल. आम्ही उलट VDO रेकॉर्डींग करून आमच्या मित्रांना दाखवू.”

संध्याकाळचा पार्क मधील कार्यक्रम ऊत्तमच झाला. गीताचे आभार प्रदर्शन आटपल्यावर सोनूचे गुणगान सुरू झाले. अनेक लोकांनी सोनूचे भरभरून कौतुक केले. सोनू खूप हुषार, प्रेमळ व लाघवी आहे. त्याचे ते सुंदर रेशमी सोनेरी केस, भावपूर्ण डोळे अगदी सर्व गोष्टींचे कौतुक झाले. गीताने तर आपल्या भाषणात ‘सोनू मला दागिन्यानहूनही मौल्यवान आहे. त्याच्यामुळे माझ्या एकाकी आयुष्यात परत आनंदाचे क्षण आले.’ असेही म्हटले.

कुणी म्हणाले, ‘आज सोनूमुळे किती लोकांचे प्राण वाचलेत. आपल्या देशाचे होऊ घातलेले केवढे मोठे नुकसान वाचले. सोनू खरच ग्रेट आहे. तो सगळ्यांचा हीरो आहे.’ कुणी म्हणाले, ‘सोनू म्हणजे खरोखरी लहान मूर्ती आणि महान किर्ती आहे. एकंदरीतच या सर्व गोष्टींवरूनसोनूची लोकप्रियता दिसून येते.

दुसऱ्या दिवशी गीता सकाळी चहा पित, पेपर वाचत कोचावर बसली होती. दोन्ही मुले रात्रीच अमेरिकेला गेल्यामुळे तिला घर अगदी खायला उठले होते. फारच एकटेपणा जाणवत होता आणि तिच्या लगेच लक्षात आले सोनू कुठे दिसत नाही. कुठे गेला असेल? तिने घरभर पाहिले पण तो दिसला नाही. ती घराबाहेर बागेत त्याला शोधू लागली. कुठेच त्याचा आवाजही आला नाही. तिला जरा विचित्रच वाटले. गेट तर तिने उघडलेच नव्हते. मग? ती गेटजवळ आली.समोरचे दृष्य पाहून तिच्या पायातील जोरच गेला. तिच्या ह्रदयाचा ठोकाच चुकला. ‘सोऽऽऽनू’ म्हणत ती खालीच कोसळली. सोनू रक्ताच्या थारोळ्यात गेटच्या आतल्या बाजूस पडलेला दिसला. त्याच्या डोक्यावर कुणीतरी गोळी मारली होती.

बघता बघता लोकं जमू लागली. गर्दी वाढू लागली. गर्दीतून आवाज येत होते. सोनूने देशासाठी प्राण गमावला. सोनू हुतात्मा झाला.